# येशूचे पुनरूत्थान

## पुनरुत्थित ख्रिस्ताच्या शरीरातील आमचे स्थान आमच्या सार्वकालिक जीवनाची ण्वात्री देते

मुलांना शिकवणाऱ्यांनी E1b अभ्यास वाचावा.

**प्रार्थना.** ''स्वर्गित पित्या, तु तुझा पुभ येशू आमच्याकरीता मरण्यासाठी पाठवला. आम्ही तुझे आभार मानतो, त्याच्या द्वारे आम्हांला नवे जीवन दिलेस, त्याच्या बारोबर आम्हांला उठवलेस कृपा करुन ह्या अभ्यासाच्या द्वारे तुझा पुत्र येशू याचे सामर्थ्य व अधिका प्रकट कर, त्याला मरणातून उठवतांना तू हेच सामर्थ्य व अधिकार प्रकट केले होते''

येशूचे जीवन देणारे पुनरुत्थान साजरे करण्यासाठीची तयारी ईस्टर पूर्वी काही आठवडे आधीच सुरु करा. येशूचे मरण आणी मरणावर विजय ह्या घटनांच्या आसपास घडलेले प्रसंग विश्वासणाऱ्यांना समजावेत यासाठी तुम्ही काही खास विशेष कार्यक्रम आयोजित करा.

1. **प्रार्थना व देवाचे वचन याद्वारे तुमच्या मनाची व अंत: करणाची तयारी करा** शुभवर्तमानामध्ये येच्या पुनरुत्थानाकडे नेणाऱ्या घटना शोधा

येशूच्या मरणापूर्वीचा **शनिवार** पाहा योहान 12:1-11...

- लाजराची बहिण मरीया हिने येशूच्या मरणासाठी तयारी म्हणून काय केले

ईस्टर पूर्वीचा **रविवार** पाहा मत्तय 21:1-13...

- जखऱ्या 9 मध्ये कोणते भविष्य खूप काळ आधी वर्तवले होते, जे येशू ने त्याच्या विजयी प्रवेशाने पूर्ण केले.

ईस्टर पूर्वीचा **सोमवार** पाहा मार्क 11:15-18...

- येशू ने असे काय केले की त्यामुळे धार्मिक षुढारी त्याला जिवे मारव्यास प्रवृत्त ढझाले.

ईस्टर पूर्वीचा **मंगळवार** पाहा मार्क 11:27-33...

- येशूच्या अधिकाराला आव्हान देणाऱ्या धार्मिक पुढाऱ्यांनी त्याने बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाच्या विषयी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर द्यायचे का नाकारले.

ईस्टर पूर्वीचा **बुधवार** पाहा

- मार्क 13:1-10 व 21-27 मध्ये, येशूने त्याच्या शेवटच्या येण्याविषयी कोणते भविष्य सांगितले.
- मार्क 13:10 मध्ये येशू गौरवाने परत येण्यापूर्वी सर्व राष्ट्रांनी काय ऐकणे अगत्याचे आहे असे सांगितले आहे.
- मार्क 13:32-33 मध्ये येशू कधी परत येणार हे कोणाला ठाऊक आहे.

ईस्टर पूर्वीचा **गुरुवार** मार्क 14:12-72 मध्ये पाहा...

- वल्हाडणाच्या सणाच्या दरम्यान येशूने कोणता विधि लावून दिला.
- येशूची समर्पणाची महान प्रार्थना.
- प्रमुख याजकाने संतापाने आपले कपडे का फाडले.
- प्रथम येशूची ओळख नाकारुन नंतर कोण रडले.

ईस्टर पूर्वीचा **शुक्रवार** मार्क अध्याय 15 मध्ये पाहा...

- वचने 1-11 येशूच्या ऐवजी कोणाची सुटका कराण्यात आली.


- वचने 12-20 शिपायांनी येशूची कशा प्रकारे थट्टा केली.
- वचने 21-39, येशूला वधस्तंभावर खिळणारा शताधिपती शेवटी त्याच्याबद्दल काय म्हणाला.
- वचने 40-47 त्यांनी येशूच्या शरीराचे काय केले.

योहान 5:24-29 ह्या वचनांत **पाहा** सात्विक व दुष्कार्मी अशा दोघांमधुनही मरणातून कोण उठणार आहे.

लूक अध्याय 24 मध्ये **पाहाः**

- येशूचे पुनरुत्थान आठवडयाच्या कोणत्या दिवशी झाले (वचन 1)
- येशूने सांगितलेल्या कोणत्या गोष्टीची देवदूताने आठवण करुन दिली (2-9)
- पुनरुत्थित ख्रिस्ताने दोघा वाटसरुना असे काय सांगितले की त्यांच्या अंत: करणाला उकळी आली (वचने 10-35)
- (36-45).

- येशूने आपल्या शिष्यांना कशाचे साक्षी होण्यास सांगितले (46-48).



येशूने आपल्या शिष्यांना किती दिवस दर्शन दिले ते प्रे. कृ. 1:3 मध्ये **पाहा.**

येशूने आपल्या शिष्यांना अखेरचे कोणते अभिवचन दिले ते प्रे. कृ. 1:1-9 मध्ये **पाहा...**

1 करिंथ 15 मध्ये **पाहा...**

- येशू मृतातून उठविला गेला नाही तर विश्वासणाऱ्यांना कोणती आशा आहे. (12-20)
- येशूला 'शेवटचा आदाम' असे का म्हटले आहे (वचने 21-26 आणि 45-50).
- आमचे नवे शरीर संपूर्णपणे कसे वेगळे असणार आहे (27-44).
- प्रे. कृ. 2:22-36 संपूर्णपणे कसे वेगळे असणार आहे घोषणा केली तेव्हा त्याने येशूच्या पुनरुत्थानाला कोणते महत्व दिले.
- प्रेषितांनी ख्रिस्तासाठी साक्ष दिली त्या प्रत्येक वेळी त्यांनी येशूचे पुनरुत्थान ह्याच सत्यावर अधिक भर दिला. उदाहरणे पाहा प्रे. कृ. 3:12-21; 4:1-3; 13:15-41; 17:2-3; 26:1-23.

**2. सहकाऱ्यांशी चर्चा करुन ईस्टर पूर्वी व नंतर कोणते कार्यक्रम करायचे याची योजना आखा**

- मित्रांच्या व नातेवाईकांच्या भेटी घेऊन येशूच्या पुनरुत्थानाची आनंदाची बातमी आणि आमचा त्यातील सहभाग याबद्दल त्यांना सांगा.
- पौलाने प्रे. कृ. 22:1-22 मध्ये साक्ष दिलीतशी साक्ष देण्यास प्रत्येक विश्वासणाऱ्याचे सहाय्य करा. पुनरुत्थित ख्रिस्ताच्या भेटीने त्याचे जीवन अमुलाग्र बदलून गेले.

सहकाऱ्यांशी चर्चा करुन पुनरुत्थानाच्या रविवारच्या विशेष उपासनेचे आयोजन करा.

**3. सध्याच्या गरजा व स्थानिक रिवाज ह्यांना। अनुरुप असे कोणत्याही क्रमाने कार्यक्रम ठरवा.**

मुलांनी तयारी केलेली नाटिका, कविता किंवा प्रश्न त्यांना सादर करु घ्या.

येशूच्या पुनरुत्थानाकडे घेऊन जाणाऱ्या प्रसंगांची **उजळणी करा** (भाग 1) येशूच्या पुनरुत्थानाचा वृत्तांत सांगा किंवा नाट्यीकरण करा, लूक 24 (भाग 1) येशूच्ये पुनरुत्थान अत्यंत महत्वाचे का आहे, ते स्पष्ट करू सांगा.

- देवाने आमचे सार्वकालिक जीवन एका ऐतिहासिक वस्तुस्थितीवर आधारलेले आहे, येशू मरणातून पुन्हा उठला आणि पश्चाताप करणाऱ्या विश्वासणाऱ्यांना त्याच्या शरीराचे अवयव म्हणून उठवले जाणार आहे, इफिस 2:4-6; 1 करिथ 12:27, आणि रोम 6:5-11.
- येशूचे पुनरुत्थान हे त्याच्या मरणाप्रमाणेच त्याच्या उध्दारक कार्याचे एक भाग होते. त्याच्या रक्ताने पापक्षमेची किंमत मोजून दिली त्याचे पुनरुत्थान आणि आमचा त्यामधील सहभाग सार्वकालिक जीवनाची खात्री देतो, 1 करिंथ 15:17-26
- मरणानंतर आम्ही भूत होणार नाही किंवा पून्हा देहधारणही करणार नाही. ख्रिस्ताच्या गौरवी समक्षतेमध्ये सार्वकालिक जीवनात आम्हांला उठवले जाईल आणि आम्ही त्याचे मुख पाहू. प्रकटी 22:3-5 वे 1 योहान 3:2

1 करिंथ 15 मध्ये आढळणारी महान सत्ये **सांगा** (भाग 1)

**पाठ करा** योहान 11:25

**प्रभुभोजनाचा परिचय करुन देण्यासाठी** आम्ही भाकरीचे सेवन करीत असतान पुनरुत्थित ख्रिस्त हजर आहे याचे स्पष्टीकरण करा,

**दोन किंवा तीन जणांचे गट तयार करा** यातून एकमेकांना उत्तेजन द्या, योजना आखा आणि एकमेकासाठी प्रर्थना करा.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net